दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | रविवार, दि. २९ मार्च, २०२६ | वर्ष - १ | अंक - १८३ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

रविवार दि. २९ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२८, शालिवाहन शक १९४८, विक्रम संवत २०८२, पराभवनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, चैत्र मास, शुक्लपक्ष, एकादशी सकाळी ७-४७ पर्यंत, दिवस नक्षत्र– आश्लेषा दुपारी २-३८ पर्यंत नंतर मघा, चंद्र रास- कर्क दुपारी २-३८ पर्यंत नंतर सिंह, सूर्य रास = मीन, गुरु रास= मिथुन

### महाराष्ट्रात उष्णतेचा तडाखा!

**मुंबई** : राज्यात उष्णतेची तीव्र लाट कायम असून विदर्भातील अकोला, वर्धा आणि अमरावती येथे तापमान ४१ अंशांवर पोहोचले आहे. नागपुरात ३९ अंश असला तरी उकाडा व दमटपणामुळे नागरिक हैराण झाले आहेत. चंद्रपूर व यवतमाळमध्येही पारा ४० अंशांच्या पुढे गेला आहे. दुपारच्या वेळी रस्त्यांवर शुकशुकाट दिसून येत आहे. दरम्यान, कडक उन्हातही काही ठिकाणी अवकाळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. वाढत्या तापमानामुळे पिकांवर ताण येत आहे.

### इराणकडून भारताला दिलासा; तणावाच्या पार्श्वभूमीवर 'मित्र राष्ट्रांना' विशेष परवानगी

# आणखी दोन इंधनवाहक टँकर्सना परवानगी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**तेहरान** : अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारतासाठी दिलासादायक घडामोड समोर आली आहे. इराणने 'मित्र राष्ट्रां'ना होर्मुझ सामुद्रधुनीतून सुरक्षित मार्ग देण्याचा निर्णय घेतल्यानंतर भारताकडे येणाऱ्या आणखी दोन एलपीजी टँकर्सना या संवेदनशील जलमार्गातून प्रवासाची परवानगी मिळाली आहे.

शिपिंग डेटानुसार, बीडब्ल्यू ईएलएम आणि बीडब्ल्यू टीवायआर हे भारतीय ध्वज असलेले टँकर्स सुमारे 90 हजार टनांहून अधिक एलपीजी (स्वयंपाकाचा गॅस) घेऊन होर्मुझ सामुद्रधुनी पार करत ओमानच्या आखाताच्या दिशेने रवाना झाले. युद्धाच्या सुरुवातीपासून हा मार्ग उच्च-जोखमीचा मानला जात असताना या टँकर्सचा सुरक्षित प्रवास भारतासाठी महत्त्वाचा ठरला आहे.

दोन्ही टँकर्सने सुमारे 27 किमी प्रतितास वेग कायम ठेवत एकमेकांच्या जवळून प्रवास केला. या हालचालीमुळे जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर निर्माण झालेल्या अनिश्चिततेत काही प्रमाणात दिलासा मिळाल्याचे मानले जात आहे. दरम्यान, कच्चे तेल घेऊन जाणारी आणखी सुमारे पाच भारतीय टँकर्स संयुक्त अरब अमिरातीच्या किनाऱ्याजवळ नांगरून असून त्यांना होर्मुझ सामुद्रधुनी पार करण्यासाठी परवानगीची प्रतीक्षा आहे. एकूण 20 भारतीय ध्वज असलेली जहाजे आखातात अडकून पडली असून, त्यांचा प्रवास पुढील परवानग्यांवर अवलंबून आहे.

विशेष म्हणजे, या संकटाच्या काळात भारताने काही रिकाम्या जहाजांमध्ये एलपीजी भरण्याची प्रक्रिया सुरू ठेवली आहे, जेणेकरून परवानगी मिळताच ती जहाजे त्वरित भारताकडे रवाना करता येतील. या धोरणामुळे देशातील इंधन पुरवठा सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी याबाबत भूमिका स्पष्ट करत चीन, रशिया, भारत, इराक आणि पाकिस्तान या पाच देशांना 'मित्र राष्ट्र' म्हणून घोषित केले असून त्यांच्या जहाजांना सुरक्षित मार्ग दिला जाईल, असे सांगितले. मात्र, इराणविरोधी देशांशी संबंधित जहाजांना नाकेबंदीचा सामना करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

युद्ध सुरू झाल्यापासून जग वसंत, पाइन गॅस, शिवालिक आणि नंदा देवी या किमान चार भारतीय जहाजांनी होर्मुझ सामुद्रधुनीतून यशस्वी प्रवास केला आहे. काही जहाजांनी पारंपरिक मार्ग टाळत इराणच्या लारक आणि केशम बेटांदरम्यानचा पर्यायी मार्ग निवडल्याचेही शिपिंग डेटातून स्पष्ट झाले आहे. जगातील सर्वात महत्त्वाच्या तेल वाहतूक मार्गांपैकी एक असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतील परिस्थिती अजूनही तणावपूर्ण आहे. या मार्गावर अवलंबून असलेल्या देशांसाठी प्रत्येक हालचाल महत्त्वाची ठरत असून भारतासाठी मिळालेली ही परवानगी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने मोठा दिलासा मानली जात आहे.

तज्ज्ञांच्या मते, पुढील काही दिवसांत या मार्गावरील परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक असून, जागतिक राजकारणातील घडामोडींवर इंधन पुरवठ्याचे भवितव्य अवलंबून राहणार आहे.

## 'वन स्टेट, वन पोर्टल'ला गती; 'महा सारथी' पोर्टलचे लोकार्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील डिजिटल प्रशासन अधिक सक्षम, पारदर्शक आणि नागरिककेंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 'वन स्टेट, वन पोर्टल, वन वेब ॲड्रेस' ही महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. याचाच एक भाग म्हणून 'महा सारथी' (MahaSarathi) पोर्टलचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमामुळे विविध शासकीय सेवा एकाच प्लॅटफॉर्मवर उपलब्ध होऊन नागरिकांना जलद, सुलभ आणि पारदर्शक सेवा मिळणार आहेत.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील सर्व शासकीय विभागांचे डिजिटल प्लॅटफॉर्म एकत्र आणून एकसंध प्रणाली उभारण्याचा शासनाचा उद्देश आहे. 'महा आयडी' (MahaID) आधारित सिंगल साइन-ऑन (SSO) प्रणालीमुळे नागरिकांना वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज भासणार नाही. नागरिक नोंदणी प्रणालीमुळे जात प्रमाणपत्र, रेशनकार्ड यांसारखी पडताळलेली माहिती सुरक्षित पद्धतीने एकत्रित केली जाणार आहे. राज्यातील सर्व विभाग टप्प्याटप्प्याने 'महा आयडी'शी जोडले जाणार असून त्यामुळे कामकाजात गती, कागदपत्रांची बचत आणि पारदर्शकता वाढणार आहे. डेटा सुरक्षेसाठी 'डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट २०२३', 'आधार कायदा २०१६' आणि 'माहिती तंत्रज्ञान कायदा २०००' यांचे काटेकोर पालन केले जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. 'महा सारथी' पोर्टल हे डेटा-आधारित प्रशासनासाठी 'सिंगल सोर्स ऑफ ट्रुथ' ठरणार असून विविध विभागांमध्ये समन्वय वाढवण्यास मदत करेल. योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्स्चेंज' आणि मुख्यमंत्री डॅशबोर्डसारख्या उपक्रमांचा वापर केला जाणार आहे. याशिवाय कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), एजेंटिक AI आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून शेती, उद्योग आणि सेवा क्षेत्रात सुधारणा करण्याचा सरकारचा मानस आहे.

## सारांश वृत्त

### मुंबईत 'ट्रॅश बूम'ला गती; समुद्रात जाणारा कचरा रोखणार

**मुंबई** : मुंबईतील नाले, नद्या आणि समुद्रात जाणारा तरंगता कचरा रोखण्यासाठी 'ट्रॅश बूम' प्रणालीचा वापर वाढवण्याचे निर्देश Dr Bhushan Gagrani यांनी दिले आहेत. सध्या शहरात १४ ठिकाणी ही यंत्रणा कार्यरत असून मोगरा, मजास, मानखुर्द, वाकोला व दादर-धारावी नाल्यांवर अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### किनवट तहसील कार्यालयातील 'बंद दरवाजा'चा वाद

**नांदेड** : राज्यात भोंदूगिरी प्रकरणामुळे चर्चा रंगत असतानाच नांदेडच्या किनवट तहसील कार्यालयातील एक बंद दरवाजा वादात सापडला आहे. स्थानिक नागरिक व शेतकरी संघटनांच्या मते, इमारत उभारल्यापासून पश्चिमेकडील हा दरवाजा अंधश्रद्धेमुळे बंद ठेवण्यात आला आहे. यामुळे नागरिकांना पूर्वेकडील प्रवेशद्वार वापरावे लागत असून अतिरिक्त अंतर चालावे लागते. रमेश कदम यांनी या निर्णयामुळे नागरिकांची गैरसोय होत असल्याचे सांगितले. प्रशासनाकडून मात्र याबाबत अद्याप अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

### अशोक खरात प्रकरण व्यापाऱ्याची साडेपाच लाखांची फसवणूक

**नाशिक** : भोंदूबाबा अशोक खरात याच्या अडचणी वाढत असून आणखी एका फसवणूक प्रकरणात गुन्हा दाखल झाला आहे. नेवासा येथील व्यापारी राजेंद्र भागवत यांची सुमारे साडेपाच लाखांची फसवणूक केल्याचा आरोप आहे. रत्न बसवून देतो असे सांगून 20 ग्रॅम सोन्याच्या अंगठ्या घेऊन बनावट अंगठ्या दिल्याचे समोर आले आहे.

## अंबाजोगाईत अत्याचार प्रकरणी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांची कठोर भूमिका

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**बीड** : जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यात घडलेल्या 2 वर्षे 5 महिने वयाच्या चिमुरडीवरील अत्याचार व मृत्यूची घटना अत्यंत संतापजनक असल्याचे सांगत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रशासनाला तातडीने कठोर कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत. प्राथमिक तपासात मृत्यू अपघाती असल्याचे सांगण्यात आले होते; मात्र शवविच्छेदन अहवालातून लैंगिक अत्याचार स्पष्ट झाल्याने प्रकरण गंभीर झाले असून, हा अहवाल महत्त्वाचा पुरावा ठरत आहे. पोलिसांनी अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले असून, गुन्ह्याची नोंद भारतीय न्याय संहिता 2023 व बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण कायद्यानुसार करण्यात आली आहे. घटनेची गांभीर्याने दखल घेत डॉ. नीलम गोऱ्हे यांनी बीडच्या पोलीस अधीक्षकांना निवेदनाद्वारे या प्रकरणाचा तपास जलदगती न्यायालयात चालवून आरोपीस कठोर शिक्षा देण्याची मागणी केली आहे. तसेच तपास पारदर्शक ठेवून सर्व वैद्यकीय व भौतिक पुरावे भक्कमपणे सादर करावेत, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. आरोपी अल्पवयीन असल्याने त्याच्यावर कायद्यानुसार बाल सुधारगृहात ठेवण्याची प्रक्रिया काटेकोरपणे राबवावी, असे त्यांनी नमूद केले. पीडित कुटुंबाला समुपदेशन व सुरक्षा देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बालसुरक्षा व जनजागृती मोहिमा राबविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

### स्व-प्रमाणनावर 20 परवानग्या, 'मैत्री' पोर्टलमुळे एकाच ठिकाणी सेवा

# उद्योग सुलभतेला चालना; राज्यात वीजदरात टप्प्याटप्प्याने घट

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्यातील उद्योगांना अधिक सुलभ व पारदर्शक वातावरण देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत उद्योग परवानगी प्रक्रियेत मोठे बदल करण्यात आले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, 33 परवानग्यांपैकी 20 परवानग्या स्व-प्रमाणनावर (Self Certification) आणण्यात आल्या असून उर्वरित परवानग्यांची संख्या कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

रामकी ग्रुप ऑफ इंडस्ट्रीज आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'बल्क ड्रग पार्क' आणि 'लाइफ सायन्सेस हब' प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी हसन मुश्रीफ, माधुरी मिसाळ यांच्यासह वरिष्ठ अधिकारी आणि उद्योजक उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, उद्योगांसाठी वीजदरात पुढील पाच वर्षांत टप्प्याटप्प्याने घट केली जाईल. सध्या असलेला ₹10.88 प्रति युनिट दर कमी करून सुमारे ₹9.97 पर्यंत आणण्याचे उद्दिष्ट आहे. 2028-29 पर्यंत महाराष्ट्र देशातील सर्वात कमी वीजदर असलेले राज्य ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यामुळे उद्योगांच्या उत्पादन खर्चात घट होऊन राज्याची स्पर्धात्मकता वाढण्यास मदत होणार आहे.

उद्योग परवानग्या मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी 'मैत्री' पोर्टलला सर्वसमावेशक अधिकार देण्यात आले आहेत. या पोर्टलमुळे सर्व परवानग्या एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असून अर्जाची स्थिती ट्रॅक करता येणार आहे. ठराविक कालावधीत सेवा न दिल्यास संबंधित यंत्रणांवर कारवाईची तरतूद केल्याने पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढणार आहे.

पर्यावरणपूरक विकासावर भर देत कॉमन इफ्ल्युएंट ट्रीटमेंट प्लांट (CETP), सर्क्युलर इकॉनॉमी आणि आधुनिक हरित तंत्रज्ञानाचा वापर करण्यावर शासनाचा भर राहणार आहे. उद्योगांना 'ग्रीन' बनवून शाश्वत विकास साधण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

एमएसएमई क्षेत्रालाही विशेष प्रोत्साहन देण्यात येणार असून मोठ्या उद्योगांसोबत त्यांच्या पुरवठादारांनाही सवलती देण्याची भूमिका शासनाने घेतली आहे. सार्वजनिक-खाजगी भागीदारीत जागतिक दर्जाची उद्योग परिसंस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे. "नो नॉनसेन्स बिझनेस इज अवर स्ट्रॅटेजी" या धोरणातून स्थिर, पारदर्शक आणि गुंतवणूकदारांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याचा शासनाचा निर्धार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. या उपाययोजनांमुळे महाराष्ट्र देशातच नव्हे तर जागतिक स्तरावरही उद्योगांसाठी आकर्षणाचे केंद्र बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### राजलक्ष्मी भोसले, सना मलिक आणि सरोज अहिरे यांच्या नावांची चर्चा

# राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदी कोणाची वर्णी?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये महिला प्रदेशाध्यक्ष पदासाठी नव्या चेहऱ्याच्या शोधाला वेग आला आहे. रुपाली चाकणकर यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर या महत्त्वाच्या पदावर कोणाची वर्णी लागणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा सुनेत्रा पवार यांच्यासमोर आता सक्षम आणि संघटनक्षम नेतृत्व निवडण्याचे मोठे आव्हान आहे.

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणामुळे चाकणकर अडचणीत आल्या होत्या. त्यानंतर त्यांनी प्रथम राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि त्यानंतर महिला प्रदेशाध्यक्ष पदावरूनही पायउतार झाल्या. त्यामुळे या पदासाठी नव्या नेतृत्वाची गरज निर्माण झाली आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या पदासाठी सध्या अनेक महिला नेत्यांची नावे चर्चेत आहेत. त्यात सना मलिक यांचे नाव आघाडीवर मानले जात आहे. त्या आमदार असून माजी मंत्री नवाब मलिक यांच्या कन्या आहेत. अल्पसंख्याक समाजाचे प्रतिनिधित्व करणारा चेहरा म्हणून त्यांना प्राधान्य मिळू शकते. मात्र त्यांच्या निवडीला विरोधकांकडून राजकीय विरोध होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय सरोज अहिरे यांचेही नाव चर्चेत आहे. देवळालीच्या आमदार असलेल्या अहिरे यांचा उत्तर महाराष्ट्रात प्रभाव आहे. मात्र, पक्षातील मोठ्या जबाबदाऱ्या आणि संघटन कौशल्याबाबत काही प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

वैशाली नागवडे यांना देखील अनुभवी आणि अभ्यासू नेत्या म्हणून पाहिले जाते. महानंदा संघटनेच्या अध्यक्षपदाचा त्यांना अनुभव आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत त्या सक्रिय राजकारणात काहीशा मागे पडल्याची चर्चा आहे, जी त्यांच्या निवडीसमोर अडथळा ठरू शकते. पुण्याच्या राजकारणात सक्रिय असलेल्या राजलक्ष्मी भोसले यांचे नावही जोरात आहे. त्या पुणे महापालिकेच्या माजी महापौर असून, सध्या पक्षाच्या प्रदेश उपाध्यक्ष आहेत. अलीकडील निवडणुकांमध्ये त्यांचा 'स्टार प्रचारक' म्हणून समावेश होता. संघटन कौशल्य आणि स्थानिक पातळीवरील मजबूत पकड ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. दरम्यान, महिला व बालकल्याण मंत्री अदिती तटकरे, तसेच इतर काही महिला नेत्यांचीही नावे चर्चेत आहेत. मात्र अंतिम निर्णय सुनेत्रा पवार आणि पक्ष नेतृत्वाकडूनच घेतला जाणार आहे. एकूणच, राष्ट्रवादी काँग्रेससाठी महिला प्रदेशाध्यक्ष पदाची निवड ही केवळ संघटनात्मक बदल नसून आगामी राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग ठरणार आहे.

### १ एप्रिलपासून वीजदरात कपात; ग्राहकांना दिलासा

**मुंबई** : राज्यातील वीज ग्राहकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून १ एप्रिलपासून वीजदरात कपात लागू होणार आहे. १०० युनिटपर्यंत वीज वापर करणाऱ्या घरगुती ग्राहकांना आता प्रति युनिट ८.१४ ऐवजी ७.१० रुपये मोजावे लागणार आहेत.

महावितरणच्या पाच वर्षांच्या दर कपात प्रस्तावास मंजुरी दिली आहे. १०० ते ३०० युनिटसाठी दरातही कपात झाली असून औद्योगिक ग्राहकांनाही दिलासा मिळाला आहे. सौरऊर्जा सवलती कायम ठेवण्यात आल्या आहेत, तर ई-वाहन चार्जिंगसाठी ९.५० रुपये दर निश्चित करण्यात आला आहे.

## पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हतेवर प्रशासन चालवा : फडणवीस

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील शासकीय कामकाज अधिक परिणामकारक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी पारदर्शकता, कालमर्यादा आणि विश्वासार्हता या त्रिसूत्रीवर सर्व विभागांनी काम करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. '150 दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा' कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विभागांचा सन्मान करताना ते बोलत होते.

सह्याद्री अतिथिगृह येथे आयोजित या कार्यक्रमात विविध विभागांच्या उत्कृष्ट कार्यालय प्रमुखांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री आशीष शेलार, मुख्य सचिव राजेश अगरवाल, पोलीस महासंचालक सदानंद दाते यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, नागरिकांना सर्व शासकीय सेवा एकाच व्यासपीठावर उपलब्ध करून देण्यासाठी 'वन स्टेट, वन पोर्टल' ही संकल्पना प्रभावीपणे राबविणे गरजेचे आहे. सध्या विविध संकेतस्थळांमुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे सर्व सेवा एकत्रित करणारे एकसंध पोर्टल विकसित करणे ही काळाची गरज आहे. यावेळी 'महाआयडी' या संकल्पनेचाही उल्लेख करण्यात आला. या प्रणालीद्वारे प्रत्येक नागरिकाला एक विशिष्ट आयडी देण्यात येणार असून त्याच्या आधारे विविध शासकीय योजनांचा लाभ सहज मिळू शकेल. यामुळे डेटा व्यवस्थापन सुलभ होईल तसेच गैरवापरावरही नियंत्रण ठेवता येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रशासनातील कागदोपत्री प्रक्रिया कमी करण्यावरही भर देण्यात येणार असून 'लो पेपर' प्रणालीपासून 'नो पेपर' प्रणालीकडे वाटचाल करण्याचे निर्देश देण्यात आले. यासाठी मुख्य सचिवांनी कालबद्ध कार्यक्रम आखण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

# 2011 पर्यंतची निवासी अतिक्रमणे नियमित; राज्य सरकारचा मोठा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई** : राज्यातील लाखो गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासाचा प्रश्न सोडवण्यासाठी राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सन 2011 पर्यंत झालेली आणि सध्या केवळ निवासासाठी वापरात असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला असून त्याबाबत शासन निर्णय जारी करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनंतर हा निर्णय घेण्यात आला असून 'सर्वांसाठी घरे' आणि 'विकसित महाराष्ट्र 2047' या धोरणांना गती देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे राज्यातील हजारो कुटुंबांना कायमस्वरूपी निवासाचा हक्क मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

नव्या धोरणानुसार 500 चौरस फुटांपर्यंतची निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित केली जाणार आहेत. त्यापेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या अतिक्रमणांसाठी प्रचलित बाजारमूल्याच्या केवळ 10 टक्के रक्कम कब्जेहक्क म्हणून आकारली जाणार आहे. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

मात्र, काही संवेदनशील आणि सार्वजनिक उपयोगाच्या जागांवरील अतिक्रमणांना या निर्णयातून स्पष्टपणे वगळण्यात आले आहे. नदीपात्र, नाले, गायरान जमीन, सार्वजनिक रस्ते, वने, स्मशानभूमी, खेळाची मैदाने तसेच शाळा आणि रुग्णालयांसाठी राखीव जागांवरील अतिक्रमणे कोणत्याही परिस्थितीत नियमित केली जाणार नाहीत. अशा ठिकाणी राहणाऱ्या कुटुंबांना 'प्रधानमंत्री आवास योजना' अंतर्गत पर्यायी घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

तसेच, या योजनेचा लाभ फक्त भारतीय नागरिकांनाच मिळणार असून परदेशी नागरिकांचे अतिक्रमण कोणत्याही परिस्थितीत नियमित केले जाणार नाही. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

हा निर्णय मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हा वगळता राज्यातील उर्वरित भागासाठी लागू करण्यात आला आहे. अंमलबजावणीसाठी पात्रता, अटी-शर्ती, अर्ज प्रक्रिया, पडताळणी आणि शुल्क आकारणी याबाबतची सविस्तर कार्यपद्धती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

महसूलमंत्री बावनकुळे यांनी या निर्णयासाठी वैयक्तिक पातळीवर पाठपुरावा करत अनेक बैठका घेतल्या. गरीब व गरजूंना सुरक्षित निवास मिळावा आणि त्यांचे जीवनमान उंचवावे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या निर्णयामुळे राज्यातील घरकुलाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, सामाजिक न्यायाच्या दिशेने हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

## राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पग्रस्तांसाठी मोठा दिलासा; ५७ लवादांची नियुक्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** : राज्यातील राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांमुळे भूसंपादनाशी संबंधित प्रलंबित दाव्यांच्या जलद निपटाऱ्यासाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. केंद्राच्या सहकार्याने तब्बल ५७ नवीन लवादांची नियुक्ती करण्यात आली असून, यामुळे २८ हजारांहून अधिक प्रकल्पग्रस्तांचे दावे आता वेगाने निकाली निघणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या निर्णयासाठी पुढाकार घेतला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत झालेल्या बैठकीनंतर या प्रक्रियेला गती मिळाली.

राज्यात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण भारत सरकार अंतर्गत अनेक प्रकल्प सुरू असले तरी वाढीव मोबदल्याबाबतची हजारो प्रकरणे तीन वर्षांहून अधिक काळ प्रलंबित होती. या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त व अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या ५७ अधिकाऱ्यांची लवाद म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

हे लवाद कोकण, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती आणि नागपूर विभागात कार्यरत राहणार असून प्रकरणांचे सुसूत्र विभाजन केले जाणार आहे. तसेच कामकाजाचा दरमहा आढावा घेण्याची जबाबदारी विभागीय आयुक्तांवर सोपवण्यात आली आहे.

या निर्णयामुळे प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना वेळेवर मोबदला मिळणार असून रखडलेली प्रकरणे मार्गी लागतील. परिणामी, विकास प्रकल्पांना गती मिळून राज्याच्या प्रगतीला चालना मिळणार आहे.

## संपादकीय

### मध्यपूर्वेतील तणाव, होर्मुझ संकट आणि जगाचे बदलते वास्तव




मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावपूर्ण परिस्थितीने आता जागतिक अर्थव्यवस्थेला हादरा देण्यास सुरुवात केली आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील वाढता संघर्ष हा केवळ भू-राजकीय मुद्दा राहिलेला नाही, तर त्याचे परिणाम जगभरातील सामान्य नागरिकांच्या जीवनावर स्पष्टपणे दिसू लागले आहेत. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनीत निर्माण झालेली अस्थिरता ही या संपूर्ण संकटाचे केंद्रबिंदू ठरली आहे.

जगातील सुमारे एकतृतीयांश तेलवाहतूक या सामुद्रधुनीतून होते. त्यामुळे या मार्गावर अडथळे निर्माण झाल्यास त्याचा थेट परिणाम जागतिक ऊर्जा पुरवठ्यावर होतो. सध्या हजारो जहाजे आणि तेल टँकर्स अडकून पडल्याने क्रूड ऑइलचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची शक्यता तर आहेच, पण त्यापलीकडे जाऊन अनेक उद्योगांवर याचे व्यापक परिणाम होत आहेत.

आधुनिक जगात पेट्रोकेमिकल्सचे महत्त्व प्रचंड वाढले आहे. प्लास्टिक, औषधे, पॅकेजिंग, इलेक्ट्रॉनिक्स, वाहन उद्योग अशा असंख्य क्षेत्रांमध्ये क्रूड ऑइलपासून तयार होणाऱ्या घटकांचा वापर होतो. त्यामुळे क्रूडचा पुरवठा कमी झाला की संपूर्ण उत्पादन साखळीवर परिणाम होतो. ही परिस्थिती पुढे गेल्यास अर्थव्यवस्था अक्षरशः ठप्प होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

गॅस पुरवठ्यातील अडथळे हे या संकटाचे पहिले ठळक उदाहरण आहे. कतारसारख्या देशांमधून येणाऱ्या एलपीजी आणि नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यात घट झाल्याने भारतासह अनेक देशांमध्ये औद्योगिक उत्पादनावर परिणाम झाला आहे. रेस्टॉरंट, फूड डिलिव्हरी आणि सिरॅमिक उद्योगांना याचा मोठा फटका बसत आहे. गुजरातमधील मोरबीसारख्या औद्योगिक केंद्रांमध्ये उत्पादन घटल्याने लाखो कामगारांच्या रोजगारावर संकट निर्माण होऊ शकते.

औषध उद्योगासाठीही ही परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. पॅरासिटामॉल, आयबुप्रोफेन आणि मधुमेहाच्या औषधांपासून ते अत्याधुनिक लसींपर्यंत अनेक उत्पादने पेट्रोकेमिकल घटकांवर आधारित आहेत. कच्च्या मालाचा तुटवडा निर्माण झाल्यास औषध उत्पादनात अडथळे येऊ शकतात. भारत हा जगातील सर्वात मोठा जेनेरिक औषध पुरवठादार असल्याने या अडचणींचा परिणाम जागतिक आरोग्य व्यवस्थेवरही होऊ शकतो.

कृषी क्षेत्रावरही या संकटाची छाया पडू लागली आहे. रासायनिक खतांच्या पुरवठ्यात अडथळे आल्याने उत्पादन खर्च वाढणार आहे. भारतासारख्या देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर आयात होणाऱ्या युरिया आणि इतर खतांच्या किमती वाढल्यास अन्नधान्याचे दर वाढणे अपरिहार्य ठरेल. अन्नटंचाई आणि महागाई यांचा इतिहास पाहता, अशा परिस्थितीत सामाजिक असंतोष आणि राजकीय अस्थिरता वाढण्याची शक्यता असते.

याशिवाय, सल्फर आणि हेलियमसारख्या महत्त्वाच्या घटकांची टंचाईही गंभीर ठरत आहे. हेलियमचा वापर एमआरआय मशीनमध्ये, सेमीकंडक्टर उत्पादनात आणि वैज्ञानिक संशोधनात मोठ्या प्रमाणावर होतो. त्याच्या तुटवड्यामुळे वैद्यकीय सेवा आणि डिजिटल उद्योग दोन्ही प्रभावित होऊ शकतात. सेमीकंडक्टर उद्योगात अडचणी निर्माण झाल्यास मोबाईल, लॅपटॉप, वाहन उद्योग आणि एआय तंत्रज्ञानावर मोठा परिणाम होईल. अल्युमिनियम आणि प्लास्टिकसारख्या मूलभूत साहित्यांच्या किमती वाढल्याने पॅकेजिंग उद्योग, अन्नपदार्थ, औषधे आणि दैनंदिन वस्तू महाग होण्याची शक्यता आहे. यामुळे ग्राहकांच्या खिशावर ताण वाढेल. विमान इंधन दरवाढीमुळे हवाई प्रवास महाग होईल, तर वाहतूक खर्च वाढल्याने सर्वच वस्तूंच्या किमती वाढतील. या सर्व घडामोडींचा एकत्रित परिणाम म्हणजे महागाई, रोजगारावर ताण आणि आर्थिक अनिश्चितता. विशेषतः लघु आणि गृहउद्योग सर्वाधिक प्रभावित होऊ शकतात. पर्यटन, बांधकाम आणि सेवा क्षेत्रालाही मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत अर्थव्यवस्थेतील असमतोल वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर सरकार आणि समाज या दोघांनाही सजग राहण्याची गरज आहे. संसाधनांचा योग्य वापर, ऊर्जा बचत आणि पर्यायी ऊर्जा स्रोतांचा शोध यावर भर देणे अत्यावश्यक ठरेल. कोरोनाकाळात ज्या प्रकारे संपूर्ण जगाने संकटाचा सामना केला, त्याचप्रमाणे या परिस्थितीतही सामूहिक शहाणपण आणि नियोजनाची गरज आहे.

## बसमधील किरकोळ कारणावरून युवकावर हल्ला; चार जणांविरुद्ध गुन्हा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**निघोजे येथे मध्यरात्रीची घटना; बेल्ट व कड्याने मारहाण, जिवे मारण्याची धमकी**

**म्हाळुंगे :** बसमधून थुंकल्याच्या किरकोळ कारणावरून एका तरुणावर चौघांनी मिळून बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना निघोजे परिसरात घडली आहे. या प्रकरणी दक्षिण म्हाळुंगे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, आरोपी अद्याप फरार आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी प्रसाद तुकाराम टेके (वय २१) हे खाजगी कंपनीत काम करतात. २७ मार्च रोजी रात्री सेकंड शिफ्ट संपल्यानंतर ते बसने घरी जात होते. बस निघोजे गावाच्या हद्दीत एल. एम. टी. कंपनीसमोर पोहोचली असताना, बसमधून कुणीतरी थुंकल्याने ते थेट रस्त्यावरून जाणाऱ्या मोटारसायकलस्वाराच्या अंगावर पडले. याच कारणावरून वादाची ठिणगी पडली.

मोटारसायकलवरील आरोपींनी बस थांबवून "कोण थुंकले?" असा जाब विचारला. त्यावेळी फिर्यादी ड्रायव्हरजवळ बसलेले असल्याने ते खाली उतरले. खाली उतरल्यावर आरोपींनी त्यांच्यावर अचानक हल्ला चढवला. आरोपी स्वप्नील हजारे व त्याच्या तीन अनोळखी साथीदारांनी फिर्यादीला हाताने मारहाण केली. यावेळी एका आरोपीने कमरेच्या पट्ट्याने, तर दुसऱ्याने हातातील कड्याने चेहऱ्यावर व डोक्यावर प्रहार केले. या मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, चेहऱ्यावर जखमा झाल्या आहेत. पाठीवर पट्ट्याचे वळ उमटले असून, त्यांना शिवीगाळ करत जिवे मारण्याची धमकीही देण्यात आली. या घटनेनंतर जखमी अवस्थेत फिर्यादीने पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. पोलिसांनी बीएनएस कलम ११८(१), ११५(२), ३५१, ३५२ आणि इतर संबंधित कलमान्वये गुन्हा नोंदवला आहे. दरम्यान, आरोपी घटनास्थळावरून फरार झाले असून, त्यांचा शोध सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, किरकोळ कारणावरून होणाऱ्या अशा हिंसक घटनांबाबत नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

**क्राईम डायरी**

## पुनावळेतील बांधकाम साईटवर दुर्घटना; सेफ्टी अभावामुळे मजुराचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पुनावळे येथील एका बांधकाम साईटवर काम करत असताना मजुराचा खाली पडून मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी सेफ्टी उपाययोजनांकडे दुर्लक्ष केल्याचा ठपका ठेवत कॉन्ट्रॅक्टरविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.रावेत पोलीस ठाण्यातील माहितीनुसार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास काटेवस्ती, पुनावळे येथील फेज ०३, पी विंगमधील बांधकाम साईटवर ही घटना घडली. उत्पल मनीकांत अधिकारी (वय ४५, मूळ रहिवासी – उत्तर २४ परगणा, पश्चिम बंगाल) हे सेंट्रींगचे काम करत असताना अचानक खाली पडले. यात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला.

## पिंपरीत कोयत्याने हल्ला; मित्राला वाचवताना हातावर गंभीर जखम

दैनिक राज्य लोकतंत्र




**जुन्या वादातून हल्ला; दोन आरोपी अटकेत, तिसरा फरार**

पिंपरी : पिंपरी परिसरात जुन्या वादातून कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मित्राला वाचवण्यासाठी मध्ये पडलेल्या युवकाच्या हातावर कोयत्याचा वार होऊन तो जखमी झाला. या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना २६ मार्च रोजी रात्री सुमारे १० वाजण्याच्या सुमारास ग्रिन पार्क, पिंपरी गाव येथे घडली. फिर्यादी धिरज विशाल उल्लारे (वय १९) हे त्यांच्या मित्रांसोबत परिसरात गप्पा मारत बसले होते. त्यावेळी आरोपी ओम विलास गोटे (वय १८) हा त्याच्या दोन साथीदारांसह तेथे आला.

जुन्या भांडणाच्या कारणावरून आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मित्रांना शिवीगाळ करत वाद घालण्यास सुरुवात केली. वाद चिघळताच ओम गोटे याने आपल्या जवळील कोयता काढून "तुला पाहून घेतो" अशी धमकी देत फिर्यादीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

या वेळी फिर्यादीचा मित्र वैभव विठ्ठल भाईकट्टी हा मध्ये पडून त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत असताना आरोपीने कोयत्याने वार केला. यात वैभवच्या डाव्या हातावर गंभीर जखम झाली. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली.

या प्रकरणी पिंपरी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), ३५२, ३५१ तसेच शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला आहे. आरोपी ओम गोटे आणि सुरज वाल्मिकी यांना अटक करण्यात आली असून, तिसरा आरोपी फरार आहे.

पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून फरार आरोपीचा शोध घेतला जात आहे. या घटनेमुळे पिंपरी परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आयआयएमएसमध्ये 'यशोफेस्ट'चा जल्लोष

### ३० हून अधिक महाविद्यालयांचा सहभाग; व्यवस्थापन व तांत्रिक स्पर्धांमधून नाविन्याची झलक

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस), चिंचवड येथे आयोजित 'यशोफेस्ट' हा आंतरमहाविद्यालयीन व्यवस्थापन आणि तांत्रिक महोत्सव उत्साहात पार पडला. दोन दिवस चाललेल्या या महोत्सवात ३० हून अधिक महाविद्यालयांतील एमबीए, एमसीए आणि विविध शाखांमधील २५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या महोत्सवात विविध स्पर्धांमधून विद्यार्थ्यांनी आपली सर्जनशीलता आणि कौशल्ये सादर केली. 'यशो धुरंधर' (बिझनेस प्लॅन), 'डेव्हिल्स ॲडव्होकेट' (केस स्टडी सोल्युशन), 'शेअर सम्राट' (मॉक स्टॉक), 'द मास्टरमाइंड' (क्विझ), 'जेनझेड बीजीएमआय' (गेमिंग), 'कोडिंग कुरुक्षेत्र' आणि 'कंट्रोल अल्ट डिफिट' (एरर हंट) यांसारख्या तांत्रिक स्पर्धांनी विशेष आकर्षण ठरले. तसेच 'ॲडजुगाड' (मॅड ॲड), 'इनोटेक टॉक' (टेड टॉक सिरीज), 'रंग तरंग' आणि 'आर्ट २ ॲप' यांसारख्या सर्जनशील उपक्रमांमधून विद्यार्थ्यांनी कल्पकतेची झलक दाखवली. पर्धांचे परीक्षण तज्ज्ञ आणि प्राध्यापकांनी सर्जनशीलता, सादरीकरण, नाविन्यता आणि समस्या-निवारण कौशल्यांच्या आधारे केले. नंदन ग्रुपचे प्रमुख मनुष्यबळ व्यवस्थापन अधिकारी मंगेश कुलकर्णी यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली.

विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, सांघिक कार्य आणि नवोपक्रमाची भावना विकसित व्हावी, तसेच त्यांना त्यांच्या व्यवस्थापकीय व तांत्रिक कौशल्यांचे प्रदर्शन करण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळावे, हा या महोत्सवाचा मुख्य उद्देश असल्याचे आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनी सांगितले.

## लोकमान्य टिळक रुग्णालयाचा भव्य विस्तार; ३,२८६ खाटांची क्षमता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मुंबईतील लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालयाच्या पुनर्विकास टप्पा-२च्या भूमिपूजनामुळे राज्यातील नागरिकांना आधुनिक आणि दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. या विस्तारानंतर रुग्णालयाची क्षमता सध्याच्या १९०० खाटांवरून तब्बल ३,२८६ खाटांपर्यंत वाढणार आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शीव (सायन) येथील या प्रकल्पासाठी सुमारे २,५०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून २०३० पर्यंत बांधकाम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या अंतर्गत १५ मजली मुख्य रुग्णालय, १३ मजली कर्करोग विभाग, १४ मजली आपत्कालीन सेवा विभाग, १३ मजली ओपीडी इमारत तसेच डॉक्टर व नर्सेससाठी २५ मजली निवासी टॉवर उभारण्यात येणार आहेत. याशिवाय ४० हून अधिक ऑपरेशन थिएटर्स आणि एमआरआय, सीटी स्कॅनसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध होणार आहेत. १९४७ मध्ये केवळ ६० खाटांपासून सुरू झालेल्या या रुग्णालयाने आज १९०० खाटांपर्यंत मजल मारली आहे. आशियातील मोठ्या ट्रॉमा केअर सेंटरपैकी एक म्हणून ओळख असलेल्या या रुग्णालयात ह्युमन मिल्क बँक व स्किन बँकसारख्या सुविधा आधीच उपलब्ध आहेत.

महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार दिले जात असून २,४०० आजारांवर उपचाराची सुविधा उपलब्ध आहे. या प्रकल्पामुळे आरोग्यसेवेत मोठी सुधारणा होणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## चिखली-चऱ्होली 'टीपी स्कीम' रद्द होण्याची शक्यता; भूमिपुत्रांना दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** मौजे चिखली आणि चऱ्होली परिसरातील प्रस्तावित 'टाऊन प्लॅनिंग (टीपी) स्कीम' अखेर रद्द होण्याच्या मार्गावर असल्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. भाजपा आमदार महेश लांडगे यांनी महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्यासोबत घेतलेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत याबाबत सकारात्मक निर्णयाची दिशा ठरली. त्यामुळे स्थानिक ग्रामस्थ आणि भूमिपुत्रांना मोठा दिलासा मिळणार आहे. सुमारे तीन तास चाललेल्या या बैठकीत आमदार लांडगे यांनी भूमिपुत्रांची भूमिका ठामपणे मांडली. शहराच्या विकासाच्या नावाखाली गेल्या अनेक दशकांत वारंवार भूसंपादन करून स्थानिकांवर अन्याय झाल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. औद्योगिक विकास महामंडळ, नवनगर विकास प्राधिकरण तसेच विविध औद्योगिक प्रकल्पांसाठी झालेल्या भूसंपादनाचा उल्लेख करत त्यांनी 'टीपी स्कीम' लागू करू नये, अशी मागणी केली. चिखली आणि चऱ्होली परिसरातील नागरिकांमध्ये या योजनेविरोधात तीव्र असंतोष होता. आमदार लांडगे यांनी सातत्याने या स्कीमला विरोध दर्शवला होता. आयुक्त शेखर सिंह रजेवरून परतल्यानंतर तातडीने बैठक घेण्यात आल्याने या प्रश्नाला वेग मिळाला. बैठकीनंतर आयुक्तांनी 'टीपी स्कीम' रद्द करण्यासंदर्भात सकारात्मक भूमिका घेत 'ग्रीन सिग्नल' दिल्याची माहिती समोर आली आहे. लवकरच याबाबत अधिकृत अधिसूचना जारी होण्याची शक्यता आहे. "भूमिपुत्रांवर अन्याय होऊ देणार नाही," अशी ठाम भूमिका आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केली.

## महापौरांच्या हस्ते कलाकार, खेळाडू व साहित्यिकांचा सन्मान करण्याचा ठराव मंजूर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** महानगरपालिकेच्या कला, क्रीडा व साहित्य समितीच्या बैठकीत शहरातील कलाकार, खेळाडू आणि साहित्यिकांचा महापौरांच्या हस्ते सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी मांडलेल्या या प्रस्तावाला सर्व सदस्यांनी पाठिंबा दिला.

दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात समितीचे सभापती कैलास कुटे यांच्या अध्यक्षतेखाली ही आढावा बैठक पार पडली. बैठकीत शहरातील कला, क्रीडा आणि साहित्य क्षेत्राच्या विकासासाठी विविध धोरणांवर सकारात्मक आणि सखोल चर्चा करण्यात आली.शहरातील गुणी कलाकार, खेळाडू आणि साहित्यिकांना प्रोत्साहन देण्यासाठी नव्या उपक्रमांची आखणी करण्यावर भर देण्यात आला. तसेच त्यांच्या कर्तृत्वाची दखल स्थानिक पातळीपासून राज्य आणि राष्ट्रीय स्तरापर्यंत कशी पोहोचवता येईल, याबाबतही विस्तृत विचारमंथन झाले. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे नाव उंचावणाऱ्या व्यक्तींचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात यावा, असा ठराव मंजूर करण्यात आला. बैठकीला समिती सदस्य शाम जगताप, धर्मपाल तंतरपाळे, उदय गायकवाड, योगेश लांडगे, प्रमोद कुटे, तसेच उपआयुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड आणि जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते. दरम्यान, पुणे महापौर चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत कांस्यपदक पटकावणाऱ्या संघाचा समितीच्या वतीने गौरव करण्यात आला. सभापती कैलास कुटे यांच्या हस्ते संघाला प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या संघात मनीषा राठोड, रेखा राठोड, कोमल राठोड, शिफा वस्ताद, सविता गवई, भूमिका गोरे, विधा गायकवाड, निकिता माळी, पूजा तेलंग, श्रावणी सावंत, रूपाली डोंगरे, कीर्ती कडगंची, प्रीती केरळकर आणि नंदिनी साधू यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे शहरातील विविध क्षेत्रांतील प्रतिभावंतांना प्रोत्साहन मिळणार असून पिंपरी-चिंचवडची सांस्कृतिक आणि क्रीडा परंपरा अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### जागतिक रंगभूमी दिनानिमित्त सदानंद अंचवल स्मृती पुरस्कारांचे वितरण; विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा गौरव

## विद्यार्थ्यांनी भारताला 'जगाचे गुरुस्थान' मिळवून द्यावे–पांडुरंग बलकवडे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे : एकेकाळी 'सुवर्ण भारत' म्हणून जगभरात ओळखल्या जाणाऱ्या देशाला पुन्हा वैभवशाली बनवून 'जगाचे गुरुस्थान' प्राप्त करून देण्याची जबाबदारी आजच्या विद्यार्थी पिढीवर आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांनी केले. करिअर घडवताना राष्ट्रनिष्ठा आणि कार्यनिष्ठा जपणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.**



जागतिक रंगभूमी दिनाच्या निमित्ताने पुण्यातील रमणबाग प्रशालेत आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या प्रसंगी बलकवडे आणि उद्योजक डॉ. दिलीप देशपांडे यांच्या हस्ते 'सदानंद अंचवल स्मृती पुरस्कार' प्रदान करण्यात आले. नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा या पुरस्कारांद्वारे गौरव करण्यात आला. अमेरिकास्थित अनिल प्रयाग यांनी या पुरस्कारांचे प्रायोजकत्व स्वीकारले आहे.

कार्यक्रमात 'नाट्य आराधना' पुरस्काराने इयत्ता सहावीतील अमोघ किरण कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला, तर 'नाट्य प्रेरणा' पुरस्कार इयत्ता दहावीतील गौरव विशाल जगताप यांना प्रदान करण्यात आला. याशिवाय राज्य नाट्य स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावलेल्या 'माय सुपर हिरो' या नाटकातील विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.

आपल्या भाषणात बलकवडे यांनी कला आणि संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित करताना सांगितले की, कला ही व्यक्तिमत्त्व विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. "कला माणसाचे जीवन समृद्ध करते आणि प्रभावी संवादाचे माध्यम ठरते. भारताला ६४ कलांची समृद्ध परंपरा लाभली असून नव्या पिढीने ती जतन करत अधिक वृद्धिंगत करावी," असे ते म्हणाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दिलीप देशपांडे यांनी नाटकाच्या प्रभावी भूमिकेवर प्रकाश टाकताना सांगितले की, "नाटक हा समाजाचा आरसा आहे. समाजातील वास्तव, चांगल्या-वाईट प्रवृत्ती यांचे प्रभावी चित्रण रंगभूमीवरून घडते. ही जिवंत कला असल्यामुळे कलाकारांकडे समयसूचकता, एकाग्रता आणि सादरीकरणाची ताकद असणे गरजेचे आहे."

कार्यक्रमाची सुरुवात तनय नाझीरकर यांनी सादर केलेल्या नांदीने झाली. उपमुख्याध्यापक महेश जोशी यांनी प्रास्ताविक करत कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली व आभार प्रदर्शन केले. अचवल यांचे वर्गमित्र दिलीप परदेशी यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत भावनिक क्षण निर्माण केला. सूत्रसंचालन दीप्ती डोळे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळा समितीचे अध्यक्ष डॉ. शरद आगरखेडकर, पर्यवेक्षिका अंजली गोरे, मंजुषा शेलूकर, नाट्यछंद विभाग प्रमुख रवींद्र सातपुते, शिक्षकवृंद, विद्यार्थी तसेच १९६३ च्या मॅट्रिक बॅचमधील अचवल यांचे वर्गमित्र मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना देणारा आणि सांस्कृतिक जाणीवा वृद्धिंगत करणारा ठरला.

## व्हर्च्युअल हॉस्पिटल्स, डिजिटल ट्विन्समुळे आरोग्यसेवेत क्रांती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित 'पल्स' परिषदेत आधुनिक तंत्रज्ञानामुळे आरोग्यसेवेत मोठी क्रांती घडत असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. व्हर्च्युअल हॉस्पिटल्स, डिजिटल ट्विन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) यांच्या मदतीने आरोग्य व्यवस्थेचा 'रिॲक्टिव्ह' मॉडेलपासून 'प्रोॲक्टिव्ह' मॉडेलकडे प्रवास सुरू असल्याचे मत यावेळी व्यक्त झाले.

"व्हर्च्युअल हॉस्पिटल्स, डिजिटल ट्विन्स" या सत्रात डॉ. संजीव कुबकड्डी, डॉ. महेश कप्पानियिल, डॉ. मयूर विभूती, पंकज राऊत आणि मार्टिन बूस्मन यांनी मार्गदर्शन केले. परिषदेत इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) आधारित पोर्टेबल उपकरणांचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. ईईजी, ईसीजी आणि रक्तदाब यांसारखी माहिती रिअल-टाइममध्ये डॉक्टरांपर्यंत पोहोचत असल्याने दूरस्थ आरोग्यसेवा शक्य होत आहे.

"व्हर्च्युअल डॉक्टर" या एआय प्रणालीमुळे रुग्णांची प्राथमिक माहिती संकलित करून डॉक्टरांसाठी संक्षिप्त अहवाल तयार केला जातो. तसेच डिजिटल ट्विन तंत्रज्ञानाद्वारे रुग्णालयातील हवा प्रवाह, व्हेंटिलेशन आणि संसर्ग नियंत्रणाचे प्रभावी नियोजन शक्य होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) आणि 3D प्रिंटिंगमुळे जटिल हृदयशस्त्रक्रियांचे अचूक नियोजन शक्य झाले आहे. मात्र, एआय वापरताना भारतीय रुग्णांच्या डेटावर आधारित मॉडेल्स विकसित करणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी नमूद केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### पीक कर्ज भरण्यासाठी कर्जदारांची गर्दी

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील विविध कार्यकारी सहकारी सोसायटींच्या कर्जदार सभासदांची पीक कर्ज भरण्यासाठी सध्या बँकांमध्ये मोठी गर्दी होत असल्याचे विभागीय अधिकारी विष्णू गायकवाड यांनी सांगितले. पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या आंबेगाव तालुक्यातील १८ शाखांमध्ये ३१ मार्चपर्यंत पीक कर्ज भरण्याची अंतिम मुदत असल्याने शेतकरी मोठ्या प्रमाणात कर्जफेड करत आहेत. तीन लाख रुपयांपर्यंत शून्य टक्के व्याजाची सवलत मिळत असल्याने तसेच शासनाने नियमित कर्जदारांसाठी जाहीर केलेल्या ५० हजार रुपयांच्या प्रोत्साहनपर मदतीचा लाभ घेण्यासाठी सभासदांची धावपळ सुरू आहे. यासाठी बँकेने सर्व सुट्ट्या रद्द करून शाखा सकाळी १० ते सायंकाळी ५ पर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कर्जदारांनी वेळेत पीक कर्ज भरावे, असे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### मंचरमध्ये अवकाळी पावसाची हजेरी

**मंचर :** मंचर शहर व परिसरात शनिवारी (दि. २७) दुपारी सुमारे एकच्या सुमारास अचानक अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. अवघ्या पाच ते दहा मिनिटे पडलेल्या सरींनी मात्र वातावरणात गारवा निर्माण करून उकाड्यातून दिलासा दिला. मागील काही दिवसांपासून वाढलेल्या उन्हाच्या तीव्रतेमुळे नागरिक त्रस्त झाले होते. ग्रामीण भागात कांदा काढणी आणि गहू मळणीची कामे सुरू असताना या अचानक पावसामुळे शेतकऱ्यांची मोठी धावपळ उडाली. शेतात सुरू असलेल्या कामांवर परिणाम झाल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः गहू काढणी करताना शेतकऱ्यांना पावसामुळे अडचणींचा सामना करावा लागला. तसेच या अवकाळी पावसाचा आंबा पिकावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

## नियमांचे काटेकोर पालन करा - तहसिलदार सचिन वाघ

# गॅस पुरवठ्यात पारदर्शकता व शिस्त आवश्यक!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** गरजू आणि पात्र ग्राहकांनाच घरगुती गॅसचा पुरवठा सुरळीत व पारदर्शक पद्धतीने व्हावा, यासाठी कडक नियमांचे पालन करणे अत्यावश्यक असल्याचे प्रभारी तहसिलदार सचिन वाघ यांनी स्पष्ट केले. एका गॅस जोडधारकाला २५ दिवसांच्या आत दुसरे सिलिंडर देऊ नये, तसेच ऑनलाइन बुकिंग केलेल्या ग्राहकांना शंभर टक्के घरपोच सेवा देणे अनिवार्य असल्याचे त्यांनी बजावले.



आंबेगाव तालुक्यातील सर्व गॅस पुरवठाधारकांची आढावा बैठक घोडेगाव येथील तहसील कार्यालयात पार पडली. या बैठकीत तहसिलदार वाघ यांनी गॅस वितरणातील अनियमितता रोखण्यासाठी स्पष्ट सूचना दिल्या. "फिफो (पहिले आले, पहिले सेवा) आणि ओटीपी प्रणालीचा वापर करूनच वितरण करावे. ग्राहकांना एजन्सी किंवा गोदामावर बोलावू नये," असे त्यांनी ठामपणे सांगितले.

तसेच, तेल कंपन्यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक रक्कम आकारणे, चुकीच्या पद्धतीने वितरण करणे किंवा काळाबाजार करणे यावर कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. अशा प्रकारची अनियमितता आढळल्यास संबंधित वितरकावर अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. गॅस एजन्सींनी ठरलेल्या वेळेतच कामकाज सुरू व बंद ठेवावे, जेणेकरून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. तसेच दररोज गॅस टाकीची मागणी व पुरवठ्याची माहिती प्रशासनाला कळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कोणत्या गावांमध्ये गॅस वितरणासाठी वाहन जाणार आहे, याची पूर्वकल्पना पुरवठा अधिकाऱ्यांना देणेही आवश्यक आहे. बैठकीस तालुका पुरवठा अधिकारी माधुरी संतोषवार, विलास बोऱ्हाडे, प्रतिक सांडभोर तसेच सर्व गॅस वितरक उपस्थित होते. ग्राहकांच्या तक्रारी टाळण्यासाठी सर्वांनी दक्षता घ्यावी आणि तपासणीसाठी येणाऱ्या पथकांना पूर्ण सहकार्य करावे, असेही यावेळी सांगण्यात आले. दरम्यान, गॅस टंचाईबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहनही प्रशासनाने केले आहे. नागरिकांनी घाबरून जाऊन सिलिंडरची अनावश्यक साठवणूक करू नये, असे स्पष्ट करण्यात आले. गॅस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासनाकडून सर्व आवश्यक उपाययोजना केल्या जात असल्याचे पुरवठा अधिकारी माधुरी संतोषवार यांनी सांगितले. "पुरवठाधारकांनी नागरिकांच्या अडचणी समजून घेत त्यांचे फोन उचलावेत आणि शंकांचे तत्काळ निरसन करावे. नागरिकांना दिलासा देणे हीदेखील त्यांची जबाबदारी आहे," असे संतोषवार यांनी नमूद केले. या बैठकीत दिलेल्या सूचनांमुळे गॅस वितरण व्यवस्थेत शिस्त, पारदर्शकता आणि विश्वासार्हता निर्माण होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला.

## अवकाळी पावसाने आंबेगावच्या पूर्व भागात शेतकऱ्यांची धांदल



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात शनिवारी (दि. २७) दुपारी झालेल्या अचानक अवकाळी पावसामुळे शेतकरी वर्गात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. रब्बी हंगामातील कांदा काढणी आणि गहू मळणी अंतिम टप्प्यात असताना आलेल्या पावसाने शेतकऱ्यांची धांदल उडाली आहे.

परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी काढणी केलेला कांदा शेतातच उघड्यावर ठेवलेला होता. अचानक पडलेल्या पावसामुळे कांद्याच्या दर्जावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. ओलावा वाढल्यास कांदा काळवंडणे, कुजणे आणि वजन घटणे यासारखे धोके संभवतात. दुसरीकडे, गहू मळणीही मोठ्या प्रमाणात सुरू असून मळणी केलेल्या गव्हाच्या गंजी शेतातच ठेवलेल्या आहेत. पावसामुळे गव्हाचे दाणे ओलाव्याने खराब होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी धान्य झाकण्यासाठी किंवा सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी धावपळ सुरू केली आहे. नुकसान टाळण्यासाठी अनेक शेतकरी कांद्याची साठवण 'बराकी'त करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न करत आहेत. काही ठिकाणी साठवणुकीसाठी जागा अपुरी पडत असल्याने पर्यायी व्यवस्था करण्याची धडपड सुरू आहे. अवकाळी पावसामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांच्या चिंतेत भर पडली आहे.

# खडकवाडी-नाथनगर येथे भैरवनाथ यात्रा उत्सवाची धामधूम

## कुस्ती आखाडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील खडकवाडी-नाथनगर येथे भैरवनाथ यात्रा उत्सवानिमित्त विविध धार्मिक, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले असून मंगळवार (दि. ३१ मार्च २०२६) रोजी हा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे.



उत्सवाची सुरुवात सकाळी ७ ते ८ वाजता श्री भैरवनाथांची महापूजा, हारतुरे, मांडव डहाळे आणि अभिषेकाने होणार आहे. त्यानंतर सकाळी ८ ते सायंकाळी ७ वाजेपर्यंत बैलगाडा शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या शर्यतींसाठी तब्बल ३ लाख ५१ हजार ५५५ रुपयांचे आकर्षक बक्षीस ठेवण्यात आले आहे. विजेत्यांना रोख रक्कमेसह एलसीडी, कूलर, फ्रिज, फॅन आणि बैलगाड्यांसारखी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

बैलगाडा शर्यतीत प्रथम क्रमांकासाठी ७५,००१ रुपये, द्वितीय ६५,००१ रुपये, तृतीय ५१,००१ रुपये आणि चतुर्थ क्रमांकासाठी २५,००१ रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले आहे. तसेच फायनल स्पर्धेसाठीही विशेष रोख पारितोषिके आणि आकर्षक ट्रॉफी ठेवण्यात आल्या आहेत. स्पर्धेसाठी टोकन रविवारी (दि. २९) सकाळी ८ ते १२ या वेळेत देण्यात येणार असून, टोकन फी ५०० रुपये आहे.

# चासकमान-भामा आसखेड परिसरात पूल-कम-बंधाऱ्यांना गती

## आ. बाबाजी काळे यांच्या पाठपुराव्याला यश; सर्वेक्षण प्रक्रिया वेगात

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** खेड-आळंदी मतदारसंघातील पाणीटंचाई आणि दळणवळणाच्या समस्या सोडविण्यासाठी चासकमान व भामा आसखेड धरण परिसरात पूल-कम-बंधारे उभारण्याचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव आता मार्गी लागण्याच्या दिशेने पुढे सरकत आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश मिळत असून संबंधित यंत्रणांनी सर्वेक्षण प्रक्रियेला गती दिली आहे.



स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांच्या मागणीची दखल घेत आमदार काळे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर तात्काळ या विषयावर सखोल अभ्यास करून जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे पूल-कम-बंधाऱ्यांची मागणी केली होती. त्यानुसार मंत्री विखे पाटील यांनी संबंधित विभागाला स्थळ पाहणीचे आदेश दिले होते.

सप्टेंबर २०२५ मध्ये संबंधित अधिकारी, स्थानिक ग्रामस्थ आणि आमदार बाबाजी काळे यांच्या उपस्थितीत संभाव्य ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीत पूल-कम-बंधाऱ्यांसाठी योग्य स्थळांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे. त्यानंतर आमदार काळे यांनी पुढील तांत्रिक सर्वेक्षण तातडीने सुरू करण्याची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत जलसंपदा विभागाने सर्वेक्षण प्रक्रियेला वेग देण्याचे निर्देश दिले आहेत. प्रस्तावित पूल-कम-बंधाऱ्यांमुळे पाणीसाठा वाढून शेतीसाठी मोठा फायदा होणार आहे. तसेच, गावांमधील दळणवळण सुलभ होऊन नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडणार आहेत. खेड-आळंदी मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण कटिबद्ध असल्याचे आमदार बाबाजी काळे यांनी यावेळी सांगितले. या प्रकल्पांमुळे शेतकरी आणि नागरिकांना दीर्घकालीन दिलासा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# राजगुरुनगरमध्ये भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरण व लसीकरण मोहिमेला प्रारंभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** शहरातील भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर नियंत्रण मिळवण्यासाठी राजगुरुनगर नगरपरिषदेच्या वतीने निर्बीजीकरण (ABC) आणि अँटीरेबीज लसीकरण मोहिमेला शनिवारी (दि. २८ मार्च २०२६) प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेअंतर्गत पहिल्याच दिवशी शहरातील विविध भागांतून सुमारे ५० भटक्या कुत्र्यांना पकडण्यात आले असून त्यापैकी ११ कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यात आले आहे.





नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर आणि मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी या उपक्रमाची माहिती दिली. उर्वरित कुत्र्यांचे निर्बीजीकरण आज किंवा उद्या पूर्ण करण्यात येणार आहे. गरोदर किंवा पिल्लांना दूध पाजणाऱ्या मादी कुत्र्यांना मात्र त्यांच्या मूळ ठिकाणी सोडण्यात आले आहे.

गेल्या काही महिन्यांत राजगुरुनगरसह खेड तालुक्यात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला होता. नागरिकांवर चावे घेण्याच्या घटना, शाळकरी मुलांवर हल्ले आणि रस्त्यावर भीतीचे वातावरण निर्माण झाल्याने प्रशासनावर तातडीने उपाययोजना करण्याचा दबाव वाढला होता. या पार्श्वभूमीवर ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

निर्बीजीकरणानंतर कुत्र्यांना अँटीरेबीज लस देण्यात येत असल्याने रेबीजचा धोका कमी होण्यास मदत होणार आहे. भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी ही मोहीम सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी गरकळ यांनी सांगितले.

## एसएफआय जुन्नर तालुका अधिवेशन उत्साहात संपन्न

**जुन्नर :** स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया (SFI) जुन्नर तालुका समितीचे २२ वे अधिवेशन २५ मार्च रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनात १७ सदस्यांची नवीन तालुका समिती निवडण्यात आली असून अध्यक्षपदी सुरज बांबळे, तर सचिवपदी स्वामी गवारी यांची एकमताने निवड करण्यात आली. ध्वजारोहण व शहीद भगतसिंग यांच्या प्रतिमेला अभिवादन करून अधिवेशनाची सुरुवात झाली. उद्घाटन, प्रतिनिधी आणि निवड सत्र अशा तीन टप्प्यांत कार्यक्रम पार पडला. शिक्षण, सामाजिक परिस्थिती व विद्यार्थी चळवळीची भूमिका यावर मार्गदर्शन करण्यात आले.अधिवेशनात शून्य शुल्क प्रवेश, शिष्यवृत्ती, वसतिगृह, तसेच महिलांवरील अत्याचाराविरोधातील लढा तीव्र करण्याचे ठराव मंजूर करण्यात आले.

# राजगुरुनगर नगरपरिषदेत 'अभय योजना' लागू; मालमत्ता करावरील ५०% दंड माफी

## थकबाकीदारांसाठी सुवर्णसंधी; ३१ मार्चपर्यंत योजनेचा लाभ घेण्याचे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** थकीत मालमत्ता कर भरणाऱ्या नागरिकांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राजगुरुनगर नगरपरिषदेने घेतला असून 'अभय योजना' लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत मालमत्ता करावरील दंडात्मक व्याजात ५० टक्के सवलत मिळणार आहे. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांनी ही माहिती दिली.




महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार आणि पुणे जिल्हाधिकाऱ्यांच्या १० मार्च २०२६ च्या आदेशानुसार ही योजना राबविण्यात येत आहे. १९ मे २०२५ पर्यंत थकीत असलेल्या मालमत्ता करावरील शास्तीमध्ये (दंडात्मक व्याज) ५० टक्के माफी देण्यात येणार आहे. मात्र, यासाठी मिळकतधारकांनी मूळ कराची संपूर्ण रक्कम आणि उर्वरित ५० टक्के दंडात्मक व्याज भरून अर्ज करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती अधिनियम १९६५ च्या कलम १५० (क) नुसार विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागणार आहे. करसंकलन विभागात अर्जाचे नमुने उपलब्ध असून त्याच स्वरूपात अर्ज करणे बंधनकारक आहे. अर्जासोबत सन २०२५-२६ च्या मालमत्ता कर भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे, अशी माहिती करनिरीक्षक जगदीश नागलोत यांनी दिली. ही योजना केवळ चालू आर्थिक वर्षासाठी (२०२५-२६) एकदाच लागू असून ३१ मार्च २०२६ ही अंतिम मुदत आहे. त्यामुळे नागरिकांनी विलंब न करता या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ आणि उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर यांनी केले आहे.

नगरपरिषद प्रशासनाने अधिकाधिक नागरिकांनी या योजनेचा लाभ घेऊन थकबाकी निकाली काढावी, असे आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी नागरिकांनी नगरपरिषद कार्यालयाशी संपर्क साधावा.

## गोसासी ग्रामस्थ आक्रमक; विजयसिंह शिंदे पाटील व दीप्तीताई भोगाडेंचा प्रशासनाला जाब

# सेज परिसरात कचऱ्याचे साम्राज्य; नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर संकट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरुनगर :** शिरूर-भीमाशंकर राज्य महामार्गालगत असलेल्या SEZ (MIDC) परिसरात आणि गोसासी गावाच्या हद्दीत साचलेल्या कचऱ्याच्या ढिगांमुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. दुर्गंधी, अस्वच्छता आणि संभाव्य रोगराईच्या पार्श्वभूमीवर स्थानिक ग्रामस्थ आक्रमक झाले असून त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.



या समस्येची दखल घेत पुणे जिल्हा परिषद गटनेते तथा खेड बाजार समितीचे सभापती अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील आणि जिल्हा परिषद सदस्या दीप्तीताई भोगाडे यांनी गुरुवारी (दि. २६) घटनास्थळी भेट दिली. परिसरातील भीषण परिस्थिती पाहून त्यांनी संबंधित प्रशासनाला धारेवर धरत "या घाणीच्या साम्राज्याला जबाबदार कोण?" असा संतप्त सवाल उपस्थित केला.

या भागातील कचऱ्याचे ढीग दिवसेंदिवस वाढत असून दुर्गंधीमुळे नागरिकांचे जगणे त्रस्त झाले आहे. विशेषतः शिरूर-भीमाशंकर हा महत्त्वाचा राज्य महामार्ग आधीच आरएमसी (रेडी मिक्स कॉँक्रीट) गाड्यांमुळे निसरडा झाला आहे. त्यातच आता कचऱ्यामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. पावसाळा जवळ येत असताना हा कचरा सडून विविध संसर्गजन्य आजार पसरू शकतात, अशी भीती व्यक्त होत आहे.

महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिक यांना याचा सर्वाधिक फटका बसत आहे. स्वच्छतेअभावी डास, माशा आणि जंतूंचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असून त्यामुळे आरोग्य धोक्यात आले आहे.

यावेळी बोलताना अ‍ॅड. विजयसिंह शिंदे पाटील म्हणाले, "एकीकडे विकासाच्या मोठ्या घोषणा केल्या जातात, मात्र प्रत्यक्षात मुख्य महामार्गालगत कचऱ्याचे ढीग साचलेले दिसतात, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. आरएमसी मटेरियलप्रमाणेच या कचऱ्याचाही तातडीने बंदोबस्त करणे आवश्यक आहे. अन्यथा नागरिकांच्या जीवाशी खेळणाऱ्या अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल." या वेळी खेड तालुका खरेदी-विक्री संघाचे संचालक संतोष गोरडे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामस्थांनी प्रशासनाने तातडीने उपाययोजना न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

दरम्यान, या घटनेमुळे प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित विभागांनी तातडीने कारवाई करून नागरिकांना दिलासा देणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त होत आहे.

## अलंकापुरीत रामजन्मोत्सवाची हरिनाम गजरात भक्तिमय सांगता

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** अलंकापुरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आळंदीत आवेकर भावे रामचंद्र संस्थानच्या श्री राम मंदिरात आयोजित रामजन्मोत्सव सोहळ्याची भक्तिमय वातावरणात आणि हरिनाम गजरात सांगता झाली. श्री रामरायांच्या पालखीचे माऊली मंदिरात स्वागत करण्यात आले असून ग्रामप्रदक्षिणा मिरवणुकीने उत्सवाची रंगत अधिक वाढली.

सोहळ्याची सुरुवात ज्ञानेश्वरबुवा कपलाने महाराज यांच्या हृदयस्पर्शी नारदीय कीर्तनाने झाली. त्यानंतर हरिनाम गजर, भजन, संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमांनी मंदिर परिसर दुमदुमून गेला. विविध फुलांची आकर्षक सजावट, विद्युत रोषणाई आणि रांगोळ्यांनी सजलेला परिसर भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला. रामकृष्ण वारकरी शिक्षण संस्था व इतर संस्थांच्या वारकऱ्यांनी "जय श्रीराम"च्या घोषणांनी वातावरण भारावून टाकले. भरतनाट्यम, अभंग, भजन, वाद्यसंगीत यांसारख्या विविध कार्यक्रमांनी सोहळ्याला रंगत आणली. सुमारे २५० मान्यवर, पदाधिकारी व सेवकांचा यावेळी सत्कार करण्यात आला. नवमी निमित्त माऊलींच्या संजीवन समाधीवर चंदन उटीतून साकारलेले शिंदेशाही राजबिंडे रूप हे भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरले. या दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती.

## सारांश वृत्त

### पुढील आठवड्यात शेअर बाजार फक्त तीन दिवस सुरू

**मुंबई :** पुढील आठवड्यात NSE आणि BSE येथे केवळ तीन दिवसच व्यवहार होणार आहेत. शनिवार-रविवारसह मंगळवार (महावीर जयंती) आणि शुक्रवार (रामनवमी) या सुट्यांमुळे बाजार बंद राहणार आहे. दरम्यान, MCX महावीर जयंतीदिवशी अंशतः सुरू राहील. सकाळचे सत्र बंद राहणार असले तरी सायंकाळी व्यापार सुरू होईल. मात्र गुड फ्रायडेला MCX पूर्णपणे बंद राहणार असून कोणतेही व्यवहार होणार नाहीत.

### भारतीय लष्कराची ताकद वाढली

**ग्वाल्हेर :** भारतीय लष्कराच्या क्षमतेत भर घालत 'मेक इन इंडिया' अंतर्गत तयार झालेल्या 2,000 'प्रहार' लाईट मशिन गन जवानांना सुपूर्द करण्यात आल्या. या सोहळ्यात संरक्षण मंत्रालयाचे अधिकारी ए. अंबरासू यांनी गनने भरलेल्या ट्रकला हिरवा झेंडा दाखवला. कंपनीला एकूण 40 हजार एलएमजींची ऑर्डर मिळाली असून उर्वरित पुरवठा पुढील तीन वर्षांत करण्यात येणार आहे. या स्वदेशी शस्त्रामुळे लष्कराची युद्धतयारी अधिक मजबूत होणार आहे.

### नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उद्घाटन

**नवी दिल्ली :** देशाच्या विमान वाहतूक क्षेत्रात महत्त्वाची झेप घेत उत्तर प्रदेशातील जेवर येथे नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रकल्पामुळे दिल्ली-एनसीआरमधील हवाई कनेक्टिव्हिटीला मोठी चालना मिळणार आहे. सुमारे 11,200 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीत PPP मॉडेलवर उभारलेला हा विमानतळ दिल्ली-एनसीआरसाठी दुसरे आंतरराष्ट्रीय प्रवेशद्वार ठरणार आहे. यामुळे इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरील ताण कमी होण्यास मदत होणार आहे. पहिल्या टप्प्यात दरवर्षी 1.2 कोटी प्रवासी हाताळण्याची क्षमता असून पुढील विस्तारानंतर ही क्षमता 7 कोटींपर्यंत वाढवण्याचे नियोजन आहे.

## मध्यपूर्वेत युद्धाचा विस्तार; इराणला नवा पाठिंबाच जागतिक तणाव शिगेला

# होर्मुझनंतर बाब-अल-मांदेब धोक्यात!

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत सुरू असलेल्या संघर्षाने आता गंभीर वळण घेतले असून परिस्थिती अधिकच चिघळण्याची चिन्हे दिसत आहेत. इराणची ताकद वाढल्याची चर्चा असतानाच येमेनमधील हुती बंडखोरांनी उघडपणे इराणला पाठिंबा जाहीर केल्याने अमेरिका आणि इस्रायलसमोर नवे आव्हान उभे ठाकले आहे.

या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ सामुद्रधुनीतील अस्थिरतेमुळे आधीच जागतिक तेल पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. जगातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल या मार्गातून वाहतूक होते. या मार्गात अडथळे निर्माण झाल्याने हजारो जहाजे अडकली असून इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे.

दरम्यान, येमेनमधील हुती बंडखोरांनी या युद्धात सक्रिय भूमिका घेण्याचा इशारा दिला आहे. त्यांनी स्पष्ट केले आहे की, इराणविरोधात लाल समुद्राचा वापर केल्यास किंवा नव्या देशांनी युद्धात प्रवेश केल्यास ते थेट हस्तक्षेप करतील. या भूमिकेमुळे अरबी द्वीपकल्पात युद्धाची नवी आघाडी उघडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

हुती बंडखोरांचा हस्तक्षेप झाल्यास बाब-अल-मांदेब ही महत्त्वाची सामुद्रधुनी बंद होण्याचा धोका आहे. ही सामुद्रधुनी युरोप-आशिया व्यापारासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. जर हा मार्ग बंद झाला, तर जागतिक व्यापारावर मोठा परिणाम होऊन अनेक देशांची अर्थव्यवस्था अडचणीत येऊ शकते.

युद्धामुळे आधीच अमेरिका आणि इस्रायलवर दबाव वाढलेला असताना, इराणला मिळणारा हा अतिरिक्त पाठिंबा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची करत आहे. काही ठिकाणी क्षेपणास्त्र हल्ल्यांच्या घटनांनी तणाव वाढला असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तज्ज्ञांच्या मते, या संघर्षाचा परिणाम केवळ मध्यपूर्वेत मर्यादित न राहता जागतिक पातळीवर जाणवू शकतो. ऊर्जा संकट, व्यापारातील अडथळे आणि वाढती महागाई यामुळे सामान्य नागरिकांनाही फटका बसण्याची शक्यता आहे.

सध्याची परिस्थिती पाहता, हा संघर्ष दीर्घकाळ चालण्याची शक्यता असून, त्याचे परिणाम कोरोनानंतरच्या जागतिक पुनर्बांधणीवरही परिणाम करू शकतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर तणाव कमी करण्यासाठी प्रयत्न होण्याची गरज अधिक अधोरेखित होत आहे.

## युद्धात न उतरताच पाकिस्तान बेहाल; गॅस संकटामुळे जनजीवन विस्कळीत



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**इस्लामाबाद :** मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाचा फटका आता थेट पाकिस्तानला बसताना दिसत आहे. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यात सुरू असलेल्या संघर्षामुळे पाकिस्तानमध्ये भीषण इंधन संकट निर्माण झाले आहे. विशेषतः एलपीजी गॅसच्या तुटवड्यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे.

सध्या पाकिस्तानात गॅस सिलिंडरच्या किमतीत मोठी वाढ झाली असून 11.67 किलोच्या सिलिंडरसाठी नागरिकांना 3,900 ते 5,135 पाकिस्तानी रुपये मोजावे लागत आहेत. काही दिवसांपूर्वी हा दर 3,150 ते 3,968 रुपयांच्या दरम्यान होता. अचानक झालेल्या या वाढीमुळे घरगुती बजेट कोलमडले असून स्वयंपाकासाठीही अडचणी निर्माण झाल्या आहेत. या संकटामागील मुख्य कारण म्हणजे इराणकडून होणारा गॅस पुरवठा ठप्प होणे. युद्धापूर्वी पाकिस्तानला दररोज सुमारे 10 ते 12 हजार टन गॅस मिळत होता. मात्र सध्याच्या परिस्थितीत हा पुरवठा मोठ्या प्रमाणात खंडित झाला आहे. परिणामी मागणी आणि पुरवठ्यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. रवर्षी सुमारे 20 लाख टन गॅसची गरज असलेल्या पाकिस्तानमध्ये सध्या उपलब्धता अपुरी पडत आहे.

## दिल्लीत इंडिगो विमानाचे इमर्जन्सी लँडिंग

### वैमानिकाच्या तत्परतेने 161 प्रवाशांचे प्राण वाचले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** शनिवारी सकाळी इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे एक धक्कादायक घटना घडली. IndiGoच्या विशाखापट्टणम-दिल्ली या मार्गावरील 6E 579 या विमानात उड्डाणादरम्यान तांत्रिक बिघाडाची शक्यता निर्माण झाल्याने तातडीने 'फुल इमर्जन्सी' घोषित करण्यात आली. वैमानिकाच्या कौशल्यपूर्ण निर्णयामुळे आणि विमानतळ प्रशासनाच्या तत्परतेमुळे 160 ते 161 प्रवाशांचा जीव थोडक्यात वाचला.

मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे 10:39 वाजता विमानात इंजिन संबंधित अडचणीची चिन्हे दिसू लागली. परिस्थिती गंभीर होऊ नये यासाठी तात्काळ रनवे 28 वर आपत्कालीन लँडिंगची तयारी करण्यात आली. त्यानुसार अग्निशमन दल, ॲम्बुलन्स आणि सुरक्षा पथके सज्ज ठेवण्यात आली होती. विमानाने सकाळी अंदाजे 10:54 ते 10:59 दरम्यान सुरक्षित लँडिंग केले. लँडिंगनंतर सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही. प्रवाशांची वैद्यकीय तपासणी करून त्यांना पुढील प्रवासासाठी व्यवस्था करण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार, विमान हवेत असताना इंजिन फेल होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. मात्र, वैमानिकाने शांतपणे परिस्थिती हाताळत विमान सुरक्षितपणे उतरवले. या घटनेनंतर विमानाची सखोल तपासणी सुरू असून नेमका बिघाड कशामुळे झाला याचा शोध घेतला जात आहे.

दरम्यान, अलीकडेच संसदेच्या स्थायी समितीच्या अहवालात भारतीय विमानांच्या तांत्रिक देखभालीबाबत चिंता व्यक्त करण्यात आली होती.

## युद्धाचा आर्थिक फटका; रुपया ऐतिहासिक घसरणीत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** मध्यपूर्वेत इराण, इस्रायल आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर दिसू लागला आहे. विशेषतः होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा विस्कळीत झाला असून भारताला मोठा आर्थिक धक्का बसत आहे.



युद्धाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. याचा परिणाम म्हणून भारतीय रुपयावर तीव्र दबाव निर्माण झाला आहे. शुक्रवारी रुपया अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ऐतिहासिक नीचांकी पातळीवर घसरला. एका टप्प्यावर डॉलरच्या तुलनेत रुपया 94.84 पर्यंत घसरला, तर शेवटी तो 94.81 वर स्थिरावला. ही आतापर्यंतची सर्वात मोठी घसरण मानली जात आहे. अर्थतज्ज्ञांच्या मते, परदेशी गुंतवणूकदारांकडून गुंतवणुकीत घट आणि मध्यपूर्वेतील तणावामुळे भारतीय चलनावर मोठा परिणाम होत आहे. चालू आर्थिक वर्षात रुपयात सुमारे 11 टक्क्यांची घसरण नोंदवली गेली असून गेल्या दशकातील हा विक्रमी घसरगुंडीचा काळ ठरला आहे.कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतीमुळे भारतासारख्या आयात-आधारित अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसतो. इंधन दरवाढीचा परिणाम वाहतूक, उत्पादन आणि दैनंदिन वस्तूंच्या किमतींवर होतो. त्यामुळे येत्या काळात महागाई वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, इराणने होर्मुझ सामुद्रधुनीतून केवळ निवडक देशांच्या जहाजांना परवानगी दिल्यामुळे अनेक देशांचा तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठा ठप्प झाला आहे. भारतालाही या परिस्थितीचा परिणाम भोगावा लागत असून इंधन पुरवठ्यात अनिश्चितता निर्माण झाली आहे. तज्ज्ञांच्या मते, जर युद्ध दीर्घकाळ चालले आणि कच्च्या तेलाचे दर आणखी वाढले, तर रुपयावरचा दबाव कायम राहील. यामुळे केवळ अर्थव्यवस्थाच नव्हे, तर सामान्य नागरिकांच्या खिशावरही मोठा ताण येण्याची शक्यता आहे.

सध्याच्या परिस्थितीत ऊर्जा सुरक्षितता, पर्यायी स्रोतांचा वापर आणि आर्थिक धोरणांमध्ये बदल करणे ही भारतासाठी अत्यंत महत्त्वाची बाब ठरणार आहे.

## मिलन-2026 नौदल कवायतीत फिलीपींसची कामगिरी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**विशाखापट्टणम :** आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे पार पडलेल्या Exercise MILAN 2026 या बहुराष्ट्रीय नौदल कवायतीत फिलीपीन्सच्या नौदलाने उल्लेखनीय कामगिरी केल्याचा दावा केला आहे. 30 पेक्षा अधिक देशांच्या सहभागात झालेल्या या युद्धसरावात फिलीपीन्सच्या BRP Miguel Malvar (FFG-6) या गाइडेड मिसाइल फ्रिगेटने भारतीय पाणबुडीचा यशस्वीरित्या शोध लावल्याचे सांगण्यात आले. फिलीपीन्स सशस्त्र दलांच्या वेस्ट फिलीपीन सागर विभागाचे प्रवक्ते Rear Admiral Roy Vincent Trinidad यांनी दिलेल्या माहितीनुसार, या सरावात 33 युद्धनौका सहभागी झाल्या होत्या. मात्र अँटी-सबमरीन वॉरफेयर दरम्यान केवळ त्यांच्या युद्धनौकेलाच पाणबुडी शोधण्यात यश आले, असा दावा त्यांनी केला. समुद्रात पाणबुडी शोधणे हे नौदल युद्धातील अत्यंत कठीण आणि तांत्रिकदृष्ट्या आव्हानात्मक काम मानले जाते. यासाठी अत्याधुनिक उपकरणे आणि उच्च प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची गरज असते. फिलीपीन्सकडे अत्याधुनिक तंत्रज्ञान नसतानाही त्यांच्या नाविकांनी कौशल्याच्या जोरावर ही कामगिरी केल्याचा उल्लेख त्रिनिदाद यांनी केला. "आमच्याकडे इतर देशांच्या तुलनेत प्रगत युद्धनौका नसल्या तरी आमच्या सैनिकांचे कौशल्य उत्कृष्ट आहे. ध्वनीच्या प्रसाराचा अचूक अंदाज घेत पाणबुडीचा शोध घेण्यात आमच्या नाविकांना यश आले," असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, 17 ते 26 फेब्रुवारीदरम्यान झालेल्या या कवायतीचे यजमानपद भारताने भूषवले होते. विविध देशांच्या नौदलांमध्ये समन्वय, युद्धतयारी आणि तांत्रिक कौशल्य वाढवणे हा या सरावाचा मुख्य उद्देश होता. विशेष म्हणजे, फिलीपीन्स नौदलाने या कवायतीत प्रथमच सहभाग नोंदवला होता.

### 'लॉकडाऊन नाही, टीम इंडियासारखे काम करा'

## पश्चिम आशिया संकटावर पंतप्रधान मोदींचा मुख्यमंत्र्यांशी संवाद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान Narendra Modi यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी व्हर्च्युअल बैठक घेऊन महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले. या बैठकीत परिस्थितीचा आढावा घेताना पंतप्रधानांनी स्पष्ट केले की देशात कोणतेही लॉकडाऊन लावण्यात येणार नाही. "टीम इंडियासारखे एकत्र काम करून या संकटावर मात करावी लागेल," असे ते म्हणाले.

या बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, आणि अर्थमंत्री निर्मला सितारामन उपस्थित होते. तसेच विविध राज्यांचे मुख्यमंत्रीही सहभागी झाले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह इतर प्रमुख राज्यप्रमुखांनीही आपापल्या राज्यातील परिस्थितीचा आढावा दिला.

पंतप्रधान मोदी यांनी सांगितले की सध्याच्या जागतिक



अनिश्चिततेच्या काळात ऊर्जा सुरक्षा, आर्थिक स्थिरता आणि पुरवठा साखळी मजबूत ठेवणे ही सरकारची प्राथमिकता आहे. साठेबाजी आणि नफेखोरीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी राज्यांना दिले. तसेच पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीचा पुरेसा साठा राखण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. कृषी क्षेत्रात विशेषतः खतांची उपलब्धता आणि वितरण यासाठी आधीपासून नियोजन करण्याची गरज असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. शिपिंग, आयात-निर्यात आणि समुद्री वाहतूक यंत्रणांवर परिणाम होऊ नये यासाठी किनारी राज्यांनी विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश देण्यात आले.

या बैठकीत अफवांवर नियंत्रण ठेवण्यावरही भर देण्यात आला. नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरू नये यासाठी राज्य सरकारांनी योग्य आणि विश्वासार्ह माहितीचा प्रसार करावा, असे पंतप्रधानांनी सांगितले. या संकटाच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने घेतलेल्या उपाययोजनांचे मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. विशेषतः इंधनावरील कर कपातीच्या निर्णयामुळे बाजारात स्थिरता राखण्यास मदत झाल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

## भारतात दोन नव्या सापांच्या प्रजातींचा शोध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या समृद्ध जैवविविधतेत आणखी एक महत्त्वपूर्ण भर पडली असून दोन नव्या किलबॅक सापांच्या प्रजातींचा शोध लागला आहे. Wildlife Institute of India (WII) च्या वैज्ञानिकांनी हा शोध लावला असून या प्रजाती अत्यंत दुर्मिळ मानल्या जात आहेत.

भारतामध्ये सापांच्या सुमारे ५०० पेक्षा अधिक प्रजाती आढळतात, त्यापैकी केवळ सुमारे ६० प्रजाती विषारी आहेत. नव्याने सापडलेले किलबॅक साप मात्र बिनविषारी असून पर्यावरणासाठी उपयुक्त मानले



जातात. यापूर्वी हे साप म्यानमार येथे आढळले होते. आता मिझोरम मधील न्गेंगपुई वन्यजीव अभयारण्य आणि अरुणाचल प्रदेश मधील नमदाफा राष्ट्रीय उद्यानात त्यांचे अस्तित्व स्पष्ट झाले आहे.

या सापांचे सर्वात वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्म म्हणजे त्यांची त्वचा. किलबॅक सापांची त्वचा गुळगुळीत नसून खडबडीत असते, तसेच ती प्रकाश परावर्तित करण्याची क्षमता ठेवते. त्यामुळे हे साप आपल्या आसपासच्या वातावरणात सहज मिसळतात आणि डोळ्यांना सहज दिसत नाहीत. दलदल, पाणथळ भाग आणि चिखलात हे साप पूर्णपणे लपून राहतात. रंगाच्या बाबतीत हे साप हलक्या लालसर छटेत दिसतात आणि शरीरावर मधोमध एक स्पष्ट रेषा असते. त्यांची चमकदार त्वचा आणि नैसर्गिक 'कॅमोफ्लाज' क्षमता यामुळे ते शिकारींपासून बचाव करू शकतात.

या शोधामुळे भारतातील जैवविविधतेच्या अभ्यासाला नवे परिमाण मिळाले असून, अशा दुर्मिळ प्रजातींचे संवर्धन करणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. वैज्ञानिकांच्या मते, अशा प्रजाती पर्यावरणीय समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

### रशियाचा मोठा निर्णय; 1 एप्रिलपासून पेट्रोल निर्यात बंद

**मॉस्को :** रशियाने जागतिक ऊर्जा बाजाराला धक्का देणारा निर्णय घेतला असून 1 एप्रिलपासून पेट्रोल निर्यात पूर्णपणे बंद करण्याची घोषणा केली आहे. अलेक्झांडर नोवाक यांनी ऊर्जा मंत्रालयाला याबाबत निर्देश दिले आहेत. हे निर्बंध 31 जुलैपर्यंत लागू राहण्याची शक्यता आहे. मध्यपूर्वेतील इराण संदर्भातील संघर्षामुळे तेल बाजारात निर्माण झालेल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. देशांतर्गत मागणी वाढ आणि रिफायनरी सुरक्षेच्या कारणास्तव रशियाने निर्यात रोखण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले आहे.

### पाकिस्तान अजूनही दहशतवाद्यांचे आश्रयस्थान; अमेरिकन अहवालातून खुलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** भारताच्या सुरक्षेसंदर्भात पुन्हा एकदा चिंताजनक माहिती समोर आली आहे. अमेरिकेच्या Congressional Research Service (CRS) च्या ताज्या अहवालात पाकिस्तान अजूनही भारताविरोधात सक्रिय असलेल्या दहशतवादी संघटनांचे आश्रयस्थान असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे भारतासाठी सुरक्षा धोका कायम असल्याचे अधोरेखित झाले आहे.

या अहवालानुसार पाकिस्तानमध्ये सुमारे 15 प्रमुख दहशतवादी संघटना सक्रिय असून त्यांचे मुख्य लक्ष्य जम्मू-काश्मीर आणि भारत आहे. यापैकी अनेक



संघटनांना अमेरिका आणि संयुक्त राष्ट्रांनी 'विदेशी दहशतवादी संघटना' (FTO) म्हणून घोषित केले आहे. तरीही या संघटना अद्याप कार्यरत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. CRS च्या 'इन फोकस' अहवालात असेही म्हटले आहे की, पाकिस्तानने या संघटनांवर कारवाई करण्यासाठी काही पावले उचलली असली, तरी त्यांचा पूर्णपणे नायनाट करण्यात त्यांना यश आलेले नाही.

## पश्चिम बंगाल निवडणुकीत राजकीय आरोप-प्रत्यारोप तीव्र; धर्मेंद्र प्रधान यांचा तृणमूलवर हल्लाबोल

# 'सोनार बांग्ला'च्या नावाखाली जनतेचा छळ!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** पश्चिम बंगाल : राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असून आरोप-प्रत्यारोपांना उधाण आले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार टीका करत राज्यात अराजकता निर्माण झाल्याचा आरोप केला आहे.



निवडणूक प्रचारादरम्यान बोलताना प्रधान यांनी, "गेल्या अनेक वर्षांपासून भ्रष्टाचार, राजकीय हिंसा, घुसखोरी आणि लांगुलचालन यांना संरक्षण देणारे सरकार बंगालमध्ये कार्यरत आहे. जनतेचा सरकारवरील विश्वास उडाला असून भय आणि अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे," असा हल्लाबोल केला.

ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील सरकारवर टीका करताना त्यांनी 'सोनार बांग्ला'च्या नावाखाली सिंडिकेटराज, लाचखोरी आणि कुशासनाद्वारे सामान्य नागरिकांना त्रास दिला जात असल्याचा आरोप केला. "ही निवडणूक केवळ सत्तांतरासाठी नाही, तर राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित महत्त्वाचा टप्पा आहे," असेही त्यांनी नमूद केले.

सीमावर्ती राज्य असल्याने बंगालचा विषय देशाच्या सुरक्षेशी जोडलेला असल्याचे सांगत, सरकारच्या धोरणांमुळे हा प्रश्न अधिक गंभीर झाल्याचा आरोप प्रधान यांनी केला. त्यांनी घुसखोरीचा मुद्दा उपस्थित करत केंद्र सरकारच्या भूमिकेचे समर्थन केले.

तसेच राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, महिलांविरोधातील वाढते गुन्हे, बेरोजगारी, शेतकऱ्यांची अडचण आणि आरोग्य व्यवस्थेची दयनीय स्थिती यावरही त्यांनी भाष्य केले.

"आज बंगालमध्ये युवक बेरोजगार आहेत, शेतकरी हतबल आहेत आणि आरोग्य व शिक्षण क्षेत्रात घसरण झाली आहे. त्यामुळे राज्य विकासाच्या शर्यतीत मागे पडले आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, आगामी निवडणुकीत सत्ता कायम राखण्यासाठी तृणमूल काँग्रेस प्रयत्नशील असून, भारतीय जनता पक्ष देखील पूर्ण ताकदीने मैदानात उतरला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांनी प्रचारात उडी घेतल्याने निवडणुकीची लढत अधिक चुरशीची होण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमधील निवडणूक ही केवळ राजकीय संघर्ष न राहता व्यापक राष्ट्रीय चर्चेचा विषय ठरत असून, निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.